RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 May 2014 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 May 2014

# अजायब ✸ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : अकरा | अंक : अकरावा | मे २०१४



**मनुष्यजन्म एक सुवर्णसंधी** (एक संदेश) 5

**प्रश्नोत्तरे** (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 11

**संसारिक कल्पना** (सत्संग) 19

**धन्य अजायब** (अहमदाबादमधील कार्यक्रमाची माहिती) 34

मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



# मनुष्यजन्म एक सुवर्णसंधी

परम संत अजायब सिंह महाराजजींनी संगत साठी दिलेला एक महत्वपूर्ण संदेश
संतबानी आश्रम,१६पी.एस. राजस्थान – २३ फेब्रुवारी १९९७

बाबा बिशनदासजी अत्यंत प्रेमाने एक राजाची गोष्ट सांगत असत की एक खूप सुंदर व संपन्न नगर होते व त्या नगरातील लोक सुखी व समृद्ध होते. ते दर वर्षी एक नवीन राजा निवडत असत व त्या राजाच्या हुकूमाचे पालन अदबीने करीत असत, परंतु एक वर्षानंतर ते आपल्या राजाला जंगलात सोडून येत असत, मग भले त्या राजाला जंगलात वाघ, सिंह, कुत्रे अथवा इतर हिंस्त्र पशू खाऊन का टाकेनात. सर्व राजे अशारितीने मृत्युमुखी पडत असत.

अशाच प्रकारे त्यांनी एका समंजस व्यक्तीस राजा म्हणून निवडले. तो राजा समजदार व विवेक बुद्धीचा होता, त्याने विचार केला, मला हे राज्य केवळ एक वर्षासाठी मिळालेले आहे व प्रजा माझ्या हुकूमाचे पालन करते, तेव्हा मी एखादे असे काम का करु नये ज्यामुळे एका वर्षानंतर मला आरामात जीवन जगता यावे. मला केवळ एका वर्षाकरीताच राजा बनविलेले आहे.

राजाने त्या जंगलाची बारकाईने तपासणी केली. तेथील एके जागी साफ–सफाई करवून एक प्रशस्त महाल बनविला. त्या महालात चांगले फर्नीचर, इतर खाण्या–पिण्याच्या व रहाण्यासाठी आवश्यक वस्तू जमा केल्या. तो महाल त्याने आपल्या एका खास जिवलग मित्राच्या नावे करुन त्याच्याकडे सोपविला. एक वर्ष पूर्ण झाल्यावर प्रथेनुसार लोक राजास जंगलात सोडून आले. राजाने अगोदरच तेथे आपल्या रहाण्याची व्यवस्था केलेली होती त्यामुळे तो तेथे आपले जीवन सुखाने व्यतीत करु लागला.

माझ्या प्रिय मुलांनो! ही तर एक गोष्ट आहे. या गोष्टीपासून आपण ही शिकवण घेणे गरजेचे आहे की परमात्म्याने आपणांस दिलेला **मनुष्यजन्म ही एक सुवर्णसंधी** आहे.

येथे आपले मन एक राजा असून आपली इंद्रिये प्रजाजन आहेत. आपली सर्व इंद्रिये मनाच्या आदेशांचे पालन करतात. मन जे काही सांगेल ते इंद्रिये करतात. आपणांस कल्पना आहे की, आपल्या मृत्यूनंतर आपले नातेवाईक आपणांस स्मशानात नेऊन अग्नीच्या सुपुर्द करतात किंवा जमिनीत पुरून मातीच्या सुपुर्द करतात. कबीर साहेब सांगतातः

***जब जलिए तब होए भस्म तन, रहे किरम दल खाई ।***
***कच्ची गागर नीर परत है, यह है तन की वडियाई ।।***

आपल्या शरीरास अग्नी दिल्यास त्याचे रूपांतर राखेमध्ये होते, तसेच त्यास मातीमध्ये पुरल्यास मातीमधील किडे त्यास खाऊन टाकतात. आपले शरीरदेखील एखाद्या कच्च्या मातीच्या घड्यासमान आहे, ज्या घड्यामध्ये पाणी जास्तवेळ राहू शकत नाही. आजार आपल्या शरीराचा नाश करतात. वृद्धापकाळ तर आजारांचे माहेरघरच आहे. आपणांस प्राप्त झालेला **मनुष्यजन्म** हा परमार्थप्राप्तीसाठी लाभलेली **एक सुवर्णसंधी** आहे.

समजुतदार माणसे या जन्मातच, त्यांना या जन्मानंतर उपयोगी पडतील, अशी कार्ये करतात. आपल्या मृत्युपश्चात आपणांस उपयोगी पडेल असे कार्य म्हणजे शब्द–नामाची कमाई (नामस्मरण). ज्या सतगुरुंनी आपणांस नामदान दिलेले आहे, त्यांनी आपल्या उद्धाराची जबाबदारी घेतलेली आहे.

आपण नामस्मरणाची जी काही पुंजी गोळा करतो, आपले सतगुरु त्या पुंजीचा संग्रह करतात. आपणांस माहित आहे की जे अपत्य त्याच्या वडीलांच्या सांगण्यानुसार जीवनात वाटचाल करते, त्याचे वडील त्या अपत्यास केवळ त्याच्या हक्काचेच नाही तर स्वतःच्या हक्काचीही धन–संपत्ती देतात. कारण त्यांना कल्पना असते की हा मुलगा समजुतदार आहे.

ही तर एक गोष्ट आहे ज्याचे तात्पर्य जाणून आपण ही शिकवण घेणे महत्वाचे आहे की आपणांस **मनुष्यजन्म ही एक सुवर्णसंधी** लाभलेली आहे, ज्यात आपण ते काम केले पाहिजे जे आपणांस मृत्युपश्चात उपयोगी पडेल.

गुरुमेल सिंहने आत्ताच भजनामध्ये म्हटले आहे की आपल्या अंतसमयी आपले आई-वडील, बंधू-भगिनी वा समाजातील कोणीही आपली मदत करीत नाही. आपले नोकर-चाकर, गाड्या, तिजोरीतील संचित माया, हे सर्वकाही आपणांस येथेच सोडून जावे लागते. आपल्यावर खूप प्रेम असल्याचा दावा करणारे आपले नातेवाईक आपल्यासाठी त्यांचा जीवही ओवाळून टाकतात, त्यांच्या घरी आपण गेलो असता ते आपले सन्मानाने स्वागतही करतात. परंतु आपल्या मृत्यूनंतर मात्र हेच नातेवाईक आपल्या शरीरास अग्नी देतात; मृतदेहास घरामध्ये ठेवण्यास कोण राजी असतो? त्यावेळी सर्वचजण म्हणतात की या मृतदेहाचा लवकरात लवकर अंतीमविधी करून टाकावा.

प्रियजनहो! आपण जिवंत असताना आपणांवर प्राण ओवाळून टाकणारे लाखो मित्र असतात. परंतु मृत्यूनंतर त्या मृताचे कोण जिवलग असते? त्यावेळी आपले सतगुरुच आपले खरे मित्र, खरे साथी असतात.

परमात्म्याने आपणांस नेत्र हे जग पाहण्यास तसेच हात अन्नग्रहण करण्यासाठी दिलेले आहेत. परमात्म्याने आपल्या शरीरामध्ये आत्मा ठेवलेला आहे, त्यामुळेच सर्वजण आपल्यावर प्रेम करतात. परंतु आपण मात्र त्या परमात्म्यासच विसरून गेलेलो आहोत.

ज्याप्रमाणे एखादे लहान मुल यात्रेमध्ये फेरफटका मारण्यासाठी जाते. तेथे त्यास अनेक वस्तू दिसतात. त्या वस्तू पहाण्याच्या आनंदामध्ये गर्क होत, त्या मुलाच्या हातून वडिलांचे पकडलेले बोट निसटून जाते. तेथील सर्व वस्तू त्याच जागेवर असूनही ते मूल रडू लागते. तेव्हा मात्र त्याच्या लक्षात येते की, सुख-शांती या वस्तूंमध्ये नसून, वडिलांचे बोट पकडेस्तोवर आहे.

याचतऱ्हेने आपण जर आपल्या परमात्मारुप सतगुरुंचे बोट पकडून जगात फिरलो तर या जगातील चार दिवस आपण शांतीपूर्वक जगू शकू; नाहीतर रडतच या जगात आपण येऊ व रडतच या जगातून निघून जाऊ.

मनुष्य ज्या आप्तेष्टांसाठी एखाद्या वानराप्रमाणे आयुष्यभर नाचत असतो, परंतु त्याच्या मृत्युपश्चात तेच आप्तेष्ट त्यास चितेवर ठेऊन अग्नी देतात. त्यावेळी कोणताही मुलगा-मुलगी, मित्र-मंडळी त्याच्या मदतीस येत नाहीत. एखाद्यास डाकू किंवा दरोडेखोरांनी घेरलेले असेल, त्यावेळी त्याच्या मदतीसाठी जर कोणी धावून आल्यास त्या मनुष्यास किती आनंद होईल? याचप्रकारे आपणांस नाम दिलेले सतगुरु आपल्या मदतीसाठी येतात.

आपण ना सत्संगास जातो ना सतगुरुंची सेवा करतो. सत्संगासाठी आपल्यापाशी वेळ नसतो, परंतु संसारिक गप्पांमध्ये आपला किती वेळ गेला याचे भानही आपण ठेवत नाही. आपणांस या जगातच नव्हे तर मृत्युपश्चातही जे मदत करणार असतात त्यांच्यावर आपले प्रेम नसते. कबीर साहेब म्हणतातः

***जाके हृदय गुरु नहीं सिख साखां की भूख।***
***ते नर ऐसे सूख सी ज्यों जंगल विच रूख ।।***

आपण सतगुरुंना आपल्या अंतरामध्ये प्रगट केले असेल तरच त्यांचे अस्तित्व आपल्या हृदयात असते. सतगुरुंना अंतरात प्रगट करणे हे काही आपल्या मावशीच्या घरी जाण्याइतके सोपे नसते. त्यासाठी एखादा जन्म जरी व्यतीत झाला तरीही ते कमीच आहे. तुम्ही संत-महात्म्यांचा इतिहास वाचून पहा! गुरु नानक देवजींनी दगड-कंकरांचे अंथरूण बनविले व तहान-भूक सहन केली होती. परमभाग्य असेल तरच आपला परमात्म्याशी मेळ होतो.

***पहले पाई बख्श दर पिच्छो दे गुरु घाल कमाई ।***
***भारी करी तपस्या वड्डे भाग स्यों बण आई ।।***

तुम्ही महाराज सावन सिंहजींचा-कृपालजींचा इतिहास वाचून पहा! त्यांनी परमात्मा प्राप्तीसाठी किती काबाडकष्ट केले होते? मेहनतीनेच आपल्या अंतरामध्ये सतगुरु प्रगट होतात. रात्रंदिवस नामस्मरण करा, तहान-भूक सहन करा. शरीराची नऊ-द्वारे पार करून, दोन्ही नेत्रांच्या मागे येऊन, आपण आत्म्यावरील सर्व आवरणे उतरवून पारब्रम्हाच्याही वर जाऊ. पुढे सचखंडामध्ये पोहचून सतपुरुषाशी भेट घेऊ, त्याचेच स्वरूप बनू. त्यानंतरच

सतगुरु तुमच्या हृदयामध्ये वास करतील व तुमच्या सावलीप्रमाणे तुमच्यासोबत राहतील. असा शिष्य जागृतावस्थेत तसेच झोपेतसुद्धा सतगुरु-सतगुरु उच्चारत राहतो. गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतातः

***गुरु गुरु गुरु कर मन मोर, गुरु बिना मैं नाहीं होर ।***

प्रियजनहो! संतमत केवळ कथन करण्याचा मार्ग नाही, स्वत: करण्याचे मत आहे. एखादा मनुष्य नदी किनारी नुसता उभा राहून, ती नदी पार करू शकेल काय? त्यास नदी पार करण्यासाठी मेहनत करावी लागेल, होडी वल्हवण्याचे शिक्षण घ्यावे लागेल. आपण मेहनतीशिवाय शेती करू शकत नाही, डॉक्टर किंवा वकील बनू शकत नाही. जर जगातील कोणताही व्यापार मेहनतीशिवाय होऊ शकत नाही, तर मग परमात्म्याची भक्ती मेहनतीशिवाय कशी बरे होईल? अनेक प्रेमी सुरुवातीला अगदी जोशात येऊन नाम घेतात आणि मग मात्र बहाणा बनवित असे म्हणू लागतात की, नाम जपण्याची वेळ अजून झाली नाही, सतगुरु स्वतःच माझ्याद्वारे नाम जपून घेतील, तेच माझे पापक्षालन करतील. अनेकजण सतगुरुंचा, सत्संगाचा महिमा गातात, परंतु जेव्हा मद्य-मांसाचा त्याग करण्याची व स्वमेहनतीने पैसे कमावून उदरनिर्वाह करण्याची वेळ येते तेव्हा त्यांचा जोश थंडावतो.

संत जगात येऊन सर्वांनाच आपलेसे करतात, सर्वांना उपदेशदेखील एकसमान करतात. त्यामुळे आपलेही कर्तव्य आहे की सांसारिक वाद-विवाद त्यागून आपण परमात्म्याची भक्ती करावी. ज्याप्रमाणे परमात्मा सर्वांना हवा, पाणी, पाऊस मोफत देतो, त्याचप्रमाणे संत-महात्मादेखील आम्हांकडून त्यांनी दिलेल्या शिकवणीचा मोबदला घेत नाहीत, ते मोफतच आपली सेवा करतात. आपणांस जर असे महात्मा लाभले, तर आपण त्यांच्याद्वारे मिळालेल्या ज्ञानाचा फायदा करून घेत आपले जीवन सफल करावे. **मनुष्यजन्म ही एक सुवर्णसंधी** असून ती वारंवार मिळत नाही. स्वामीजी महाराज म्हणतातः

***अपने जीव की दया पा लो चौरासी का फेर बचा लो ।***



माझ्या प्रिय मुलांनो! चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या फेऱ्यातून स्वत:ची सुटका करून घ्या, स्वतःवर दया करा. जो स्वतःवर दया करतो, त्यावर परमात्मादेखील दया करतो. ध्यान-अभ्यास करण्यात कुचराई करू नका. स्वामीजी म्हणतातः

***जो जो चोर भजन के प्राणी से से दुख सहे ।***
***आलस नींद सतावे उनको नित नित भ्रम गहे ।***
***काम क्रोध के धक्के खावें लोभ नदी में डूब मरे ।***

ध्यान-अभ्यास करण्यास कुचराई करणाऱ्याच्या मागे अनेक अडचणी लागतात. त्यामुळे आपण ध्यान-अभ्यास करण्यात कुचराई करण्याऐवजी ध्यान-अभ्यास करून आपले जीवन सफल करावे.

***

# प्रश्नोत्तरे

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे
मुंबई – १२ जानेवारी १९८७

**एक प्रेमी :** काय सेवक संतांना अशी विनंती करु शकतो का की त्यांनी स्वत:च्या प्रकृतीची नीट काळजी घ्यावी?

**बाबाजी :** बंधुनो! ही सेवकाची मर्जी आहे की त्याने संतांना काय द्यावे, नामस्मरणरूपी पुंजी द्यावी की सल्ला द्यावा. संत तर सर्वांवरच प्रसन्न असतात, मग सेवक यापैकी काहीही देवो. तरीही संतांना त्यांच्या प्रकृतीबद्दल सल्ला देणाऱ्या प्रेमीचा मी आभारी आहे, कारण अनेकदा संत स्वत:च्या प्रकृतीबद्दल निष्काळजीपणा करतात.

**एक प्रेमी :** तुम्ही स्वत:ची जी गोष्ट सांगितली की जेव्हा तुमच्या शरीरावर फोड वगैरे आले होते, तेव्हा तुमचे वडील शांत न बसता तुम्हांस संतांकडे उपचारासाठी घेऊन गेले होते. त्या घटनेस अनुसरून मी हे जाणून घेऊ इच्छिते की, आम्हांस हे कसे कळू शकते की एखादा आजार झाल्यास त्यास परमेश्वराची इच्छा मानून त्याचा स्वीकार कधी करावा व त्यावर उपचार करण्याचा प्रयत्न कधी करावा?

**बाबाजी :** ही बाब आपण सर्वांनी समजून घेणे अतिशय गरजेचे आहे. आपणांस यागोष्टीची देखील कल्पना नाही की यापूर्वी आपण या संसारमंडळावर कधी-कधी जन्मास आलो? यापूर्वी आपण किती वेळा पशू-पक्षांचा जन्म घेतला? आपण किती वेळा पती, किती वेळा पत्नी, किती वेळा मुले तसेच किती वेळा आपण मुलांचे आई-वडील बनलो? आपणांस या जन्मात आपण करीत असलेल्या कर्मांबाबतीत देखील ज्ञान नसते की आपण पुण्यकर्म करीत आहोत का पापकर्म करीत आहोत. आपण पापकर्म करीत आहोत याचे ज्ञान आपणांस असते तर आपण नक्कीच तसे कर्म केले नसते.

जीव कोणत्याही जन्मात कर्मं केल्याशिवाय राहू शकत नाही. आपण पूर्वजन्मांमध्ये जर सत्कर्मे केलेली असतील, तर परमात्मा त्या सत्कर्माचे बक्षीस म्हणून या जन्मात बालपणापासूनच परमात्म्याच्या शोधाची तळमळ आपल्या अंतरात निर्माण करून देतो. ज्याप्रमाणे सुख–दु:ख ठरलेल्या वेळी येतात, त्याचप्रमाणे सतगुरुंशी आपली गाठ देखील ठरलेल्या वेळीच होते.

ही विचार करण्याची बाब आहे की आपल्या अंतरात इच्छा कशी निर्माण झाली किंवा कोणाद्वारे ती इच्छा निर्माण केली गेली. आपण जर त्याचा सखोल विचार केला तर आपल्या लक्षात येते की, आपल्या अंतरात या सर्वांची तजबीज स्वत: परमात्म्याने अगोदरच केलेली असते. तसेच तो आपल्यावर कृपादृष्टी देखील करीत असतो.

आपल्या पूर्वकर्मांनुसारच आपणांस चांगली किंवा वाईट संगत मिळते. आपली पूर्वकर्मं जर वाईट असतील तर आपल्या मतीवर वाईट परिणाम होतो, आपणांस कुबुद्धी लाभते. त्यामुळे आपण सत्पुरुषांच्या संगतीमध्ये जाऊनही त्यांच्या सतसंगतीचा फायदा करून घेऊ शकत नाही. तसेच पूर्वजन्मांमध्ये जर आपण सत्कर्मे केलेली असतील तर त्याचे फळ म्हणून आपणांस सुबुद्धी लाभते आणि आपणांस दुर्जनांची कुसंगत आवडत नाही. आपण अशा व्यक्तीच्या शेजारी उभेही राहत नाही. आपण नेहमीच चांगल्या संगतीमध्ये राहण्याचा प्रयत्न करू.

प्रियजनहो! आपण निसर्गातील जीवजंतू सुद्धा पाहतो की जे प्राणी मांसाहारी आहेत ते गवत खाऊ शकत नाहीत तसेच गवत वगैरे खाणारे जीवजंतू मांस खाऊ शकत नाहीत. असेही पाहण्यात येते की, अनेकदा आपल्या घरातील काही पाळीव प्राणी सुद्धा असे आढळतात जे इतर प्राण्यांचे उष्टे पाणीदेखील पीत नाहीत. ते नेहमीच स्वच्छ पाणी पितात. ते त्यांच्या बसण्याच्या ठिकाणी घाण करीत नाहीत. त्या जागेहून दूर जाऊन मलमूत्र विसर्जन करतात.

अनेकदा गाय बैल वगैरे प्राणी आढळतात, जे चारा खाण्याच्या ठिकाणी घाण न करता त्या जागेवरून दूर जाऊन मलमूत्र विसर्जन करतात. मी पूर्वी राहत असलेल्या गावाची एक गोष्ट आहे. तेथे कोणीतरी एक कुत्रा पाळलेला होता. एका माणसाने त्या कुत्र्यास गोळी मारल्याने त्याच्या शरीराचा मागील हिस्सा जखमेमुळे निकामी झाला. ज्यांनी तो कुत्रा पाळला होता, त्यांच्या घरी तो जखमी कुत्रा आपल्या पुढील पायांच्या मदतीने खरडत खरडत गेला असता, त्यांनी त्या कुत्र्यास ना पाणी पाजले ना त्यास घरात येऊ दिले. तो कुत्रा बाहेरच उकिरड्यावर पडून राहिला. दिवसभरामध्ये कोणीही त्याच्यावर उपचार केला नाही का त्यास पाणी पाजले नाही.

माझा आश्रम तेथून पाच-सहाशे फूट दूरवर होता. रात्रीच्या वेळी तो कुत्रा त्याचे शरीर खरडत खरडत माझ्या आश्रमाजवळ आला. हे तर त्या परमेश्वरासच माहिती की तेथे येण्याचे त्यास कसे सुचले! त्या दिवसांमध्ये एक गावकरी दररोज संध्याकाळी माझ्या आश्रमात येत असे. साधारणत: तो रात्री दहा वाजण्याच्या आसपास परत घरी निघाला असता त्याने कुत्र्यास पाहिले की तो प्राण सोडण्याच्या तयारीत आहे. त्यास वाटले की कोणीतरी कुत्र्यास त्यास्थितीत दोरीने बांधून येथे सोडले आहे. त्यागावकऱ्याने माझ्याजवळ येऊन सर्व काही सांगितले.

मला सुरुवातीपासूनच पशू-पक्ष्यांबद्दल प्रेम व आपुलकी वाटते. हीदेखील परमात्म्याचीच माझ्यावर कृपा आहे. मी त्या ठिकाणी येऊन पाहिले, तो कुत्रा जिवंत होता. त्याने नजरेने मला विनवणी केली की त्यास पाणी पाजावे व त्याच्यावर उपचार करावे. आम्ही धावत जाऊन पाणी आणले व त्याचे तोंड पाण्यामध्ये ठेवले. शुद्धीवर आल्यावर त्याने थोडे पाणी प्यायले, मग आम्ही त्यास दूध व तुपाचे मिश्रण दिले, कारण जखमी व्यक्तीस असे मिश्रण दिले असता, त्याचा फायदा होतो. नंतर आम्ही त्यास उचलून आश्रमात घेऊन आलो जेणेकरून त्याचा योग्यरितीने औषधोपचार व्हावा.

महाराज सावन सिंहजींचा नामधारी सुंदरदास व मी, दोघांनी त्या कुत्र्याची अंदाजे दोन–तीन महिने सेवा केली. त्यास जेव्हा मलमूत्र विसर्जन करण्यास जायचे असे, तेव्हा तो त्याच्या बोलीत आम्हास तशी जाणीव करून देत असे. त्याने कधीही माझ्या खोलीमध्ये घाण केली नाही. आम्ही त्याच्या शरीराचा मागील भाग उचलत असे व पुढील पायांच्या मदतीने तो चालत बाहेर जात असे. हळूहळू काही महिन्यात त्याची तब्येत सुधारली, परंतु त्याच्या शरीराचा मागील भाग निकामीच राहिला. तरीही तो स्वत:ची दिनचर्या स्वत:च करू लागला. पुढील आठ–दहा महिने तो अतिशय आनंदाने जगला. जरी त्याची योनी केवळ कुत्र्याची असली तरी त्याचे वागणे एखाद्या मनुष्यासमानच होते. तुम्ही विचार करा! त्यास कोणी सांगितले की तू अमुक ठिकाणी जा, तेथे तुझे रक्षणकर्ते आहेत. आम्ही त्या कुत्र्यास महाराज सावन सिंहजींनी दिलेली भेट मानले, कारण सुंदरदासला महाराज सावनजींकडून नामदान प्राप्त झालेले होते.

सत्संगीने सदैव लक्षात ठेवले पाहिजे की जर त्याच्या अंतर्यात सद्‌विचार येतात वा त्याच्यावर कृपावर्षाव होत असेल तर ती परमात्म्याचीच कृपा आहे असे समजावे, कारण काळ आपल्या अंतर्यात कधीच चांगले विचार निर्माण होऊ देत नाही, आपले मन आपणास कधीच चांगला सल्ला देत नाही; ते आपल्यावर कधीच दया करीत नाही.

**एक प्रेमी :** एखाद्यास जर मद्यपान करण्याची सवय असेल, तर त्याची ती सवय सुटावी म्हणून तुम्ही त्यास काय सल्ला द्याल?

**बाबाजी :** आपण त्यास प्रेमाने वारंवार समजावले पाहिजे की नशापान करणाऱ्यांची किती वाईट परिस्थिती होते.आपणांस नेहमी पाहावयास मिळते की जे लोक खूप मद्यपान करतात, नशेसाठी गांजा वगैरे अंमली पदार्थांचा वापर करतात, अशा लोकांची फुप्फुसे व यकृत खराब होतात, त्यांच्या मेंदूवर परिणाम होतो. त्यांची विचारशक्ती क्षीण होते.

आजकाल हिंदुस्थानात मद्याच्या बाटलीवर तसेच त्याची विक्री करणाऱ्या दुकानात मद्य हे विष आहे अशी धोक्याची सूचना लिहिलेली असते. आता ते विष प्यावे का पिऊ नये ही पिणाऱ्याची मर्जी असते!

मी संगरूर येथील राज हायस्कूलमध्ये ज्ञानी पास झालो, त्या शाळेचे मुख्याध्यापक नशापान करणाऱ्यांचे कट्टर विरोधक होते. त्यांनी एक व्यंगचित्र (कार्टून) बनविले होते ज्याचे नाव 'पापांचा वृक्ष–मद्यपान' असे त्यांनी ठेवले होते. त्याव्यंगचित्रात दाखविले होते की एका हिरव्यागार वृक्षाच्या मुळाजवळ मद्याची बाटली ठेवलेली होती व त्यावृक्षास फळे लागलेली होती, त्याफळांवर लिहिले होते की 'पैसे', 'सन्मान' व 'बुद्धी' यांचा नाश. मद्यपानाची सवयच नग्नता व भूकमारीस आमंत्रण देते.

अनेकदा मद्यपी मद्यप्राशनानंतर घाणीत पडतात, उल्टीही करतात. कुत्रे ती उल्टी चाटतात आणि त्या रस्त्यात पडलेल्या मद्यप्यांचा चेहराही चाटतात. मद्यपींची यापेक्षा अधिक काय अधोगती होऊ शकते?

गुरु नानक देवजी महाराज सांगतात,''मद्य एखाद्या भल्या माणसाची मती नष्ट करून त्यास घुबड बनविते, त्यास शेपटीरहीत गाढव बनविते. नशापान करणारा व गाढव यांमध्ये काहीच फरक नसतो. नशापान करणाऱ्या मनुष्यास मोठे कान व शेपूट जरी नसेल, तरीही तो गाढवच असतो.'' गुरु नानक देवजी महाराज मद्यास 'रत' असे संबोधतात :

***जे रत लगे कपड़े, जामा होए पलीत।***
***जो रत पीवे मानसा, तिनको निर्मल चीत।।***

आजकाल आपण संत–महात्म्यांचा संदेश विसरू लागलो आहोत. गुरु गोविंद सिंहजींच्या साखीमध्ये नमूद केलेले आहे की मद्यपान करणाऱ्याची सात कुळे नरकामध्ये जातात, कारण त्याच्या कुटुंबातील मुले आपल्या वडिलधारी माणसांची नक्कल करीत मद्यपान करू लागतात. सरतेशेवटी सर्व कुटुंबच नशेच्या आहारी जाते.

कबीर साहेबांकडे येऊन एकाने प्रश्न विचारला की आपण नशापानांच्या दुष्परिणामांचा खुलासा करा, त्यांची माहिती द्या. कबीर साहेब म्हणाले की, याबद्दल तुम्हांस मी अधिक काय सांगू?

***औगुण कहूं शराब का, ज्ञानवन्त सुन ले।***
***मानस से पशुआ करे, दरभ गांठ का दे।।***

आजकाल सरकारने नशापानावर कठोर कायदे बनविले आहेत. नशापान करताना जे लोक पकडले जातात त्यांना कठीण शिक्षा केली जाते. पंजाबमध्ये दमदमा नामक एक तीर्थस्थान आहे. मी सैन्यात असताना आम्हांस तेथे नशापान करणाऱ्या लोकांना पकडण्याचा कडक हुकूम दिला गेला, कारण असे मद्यपी लोक तेथे येऊन खूप आरडाओरडा करीत असत व तीर्थयात्रेकरूंना त्रास देत असत. आम्ही अशा मद्यपान करणाऱ्यांच्या तंगड्या वर पकडून त्यांना त्यांच्या हाताच्या आधारे चालवीत होतो. आता तुम्हीच पहा! त्यांनी मद्यपानासाठी खिशातील पैसे देखील खर्च केले व सोबत सैनिकांच्या लाथा आणि शिव्यांचा भडिमार देखील सोसला. रात्री त्यांना घरी परत रवाना केले गेले. मी तर असेच म्हणेन की जे नशेच्या आहारी जातात, त्यांना त्यांच्या वाईट पूर्वकर्मांची सजाच मिळत असते.

प्रियजनहो! नशापान केल्याने सन्मान प्राप्त होत नाही. खरेतर नाशापान केल्यामुळे कुटुंबातील लोकांशी संबंध देखील बिघडतात. आई-वडील तसेच पत्नीबरोबर वाद होत राहतात. नशापान न केल्याने आपल्या पैशाची बचत तर होतेच, सोबत आपले प्रकृतीमानदेखील चांगले राहते. आपल्या आजुबाजूस राहणारे शेजारी देखील आपली प्रशंसा करतात.

मी गेल्यावेळी इंग्लंड येथे सत्संगाच्या कार्यक्रमासाठी गेलो असता, तेथे अनेक ठिकाणी जाहिराती लावलेल्या पाहिल्या. पंजाबमधून जगत सिंह नावाचा एक माणूस तेथे गेलेला होता. तो रात्रंदिवस मद्यपान करीत असे, ज्यामुळे त्याचे यकृत खराब झाले होते. त्या जाहिरातीमध्ये असे लिहिले होते की अखेरीस मद्यापुढे जगत सिंहाने हार मानली.

तुमच्या जर कोणा नातेवाईकास वा मित्रास अशी मद्यपानाची सवय जडली असल्यास तुम्ही त्याच्याशी भांडू नका. त्याने ज्यावेळी नशापान केलेले नसेल, त्यावेळी त्यास नशापानामुळे होणाऱ्या नुकसानीची माहिती द्या. परंतु त्याने नशापान केलेल्या अवस्थेमध्ये जर तुम्ही त्यास समजावण्याचा प्रयत्न केलात तर तो तुमचे म्हणणे ऐकणार तर नाहीच, तो तुमचा विरोधच करेल. गुरु नानक देवजी महाराज सांगतात :

***जिस पीते मत विसरे, विरल पवे विस आए।***

आपण समजावता की, ज्या वस्तुंच्या सेवनाने तुमच्या विचारशक्तीवर दुष्परिणाम होतो, तुमच्या मेंदूत वेडसरपणा निर्माण होतो, अशावस्तूंचा त्याग करण्यामध्येच आपला फायदा आहे. गुरु नानक देवजी महाराज म्हणतात :

***दुरमत मत जो पीवंदे, विखली मत कमली।***
***नाम रसायन जो रते, नानक सच अमली।***

कोणतेही महापुरुष आपणांस नशापान करण्याची परवानगी देत नाहीत, किंबहुना त्यापासून दूर राहण्याचाच उपदेश देतात.

**एक प्रेमी :** महाराजजी! मी अलिकडेच एक काम करण्याचे नाकारले. कारण ते काम करताना मला अनेक प्रकारच्या तडजोडी कराव्या लागल्या असत्या. त्यामुळे मला ते काम पसंद नव्हते. परंतु नंतर मला जाणवले की मी ते काम दृढ निश्चयाने स्वीकारावयास हवे होते. तसेच सर्वप्रकारे प्रयत्न करून ते काम पूर्ण करावयास हवे होते.

**बाबाजी :** ते काम करण्याची इच्छाशक्ती अजूनही तुमच्या अंतरात असेल, तर ते काम तुम्ही दृढ निश्चयाने पुन्हा सुरू करु शकता. एखाद्या कामातील अडीअडचणी पाहून आपले निर्बळ मन भयभीत होते. क्षुल्लक अडचणी पाहून आपण काम सोडून देतो. परंतु तेच मन नंतर अंतरामध्ये अस्वस्थतादेखील निर्माण करते. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जर सकाळी घर सोडून गेलेला मनुष्य संध्याकाळी परत आल्यास, त्याच्या चुकांकडे दुर्लक्ष करावे.''



अनेकदा प्रेमी घाईघाईत निर्णय घेऊन आपले काम सोडून देतात, परंतु त्यांनी तो निर्णय घाईघाईतच घेतलेला असतो. त्यांना स्वत: केलेली चूक नंतर लक्षात येते, कारण तसे काम त्यांना पुन्हा मिळत नाही. मग लोकलज्जेमुळे त्यांना भीडा वाटते की, मी पुन्हा त्याच कामासाठी तेथे गेल्यास लोक काय म्हणतील? परंतु प्रेमींनी असा विचार करू नये. जर तेच काम समोरून मान ठेवून मिळत असेल तर ते काम करण्यास नक्कीच पुन्हा सुरुवात करावी. माझ्या बालपणाची घटना आहे. त्यावेळी मी वयाने बराच लहान होतो. एक वयस्कर गृहस्थ रूसून घर सोडून निघून गेले. अनेकजणांना अशा प्रकारे रूसून घर सोडून निघून जाण्याची सवय असते. ते गृहस्थ देखील त्याच्या घरापासून दहा–बारा मैल दूरपर्यंत चालून आले. समोर मला पाहून त्यांनी मला विचारले, ''मुला! मी तुझ्याहून वयस्कर आहे. परंतु सुज्ञ लोक म्हणतात की, वेळ आल्यास भिंतीकडूनही सल्ला घ्यावा, तू तर मुलगा आहेस. मला सांग, जर कोणी रूसून घरातून बाहेर पडल्यास, त्याने काय करावे?''मी म्हणालो,''त्याने घरी परत जावे.'' त्यावर ते हसून म्हणाले, ''ठिक आहे मुला! मी परत जातो.'' नंतर ते अनेकदा मला भेटले. ते मला म्हणत असत,''तू माझा गुरु आहेस, तू मला चांगला सल्ला दिलास.''

***

# संसारिक कल्पना

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज,
गुरु अर्जुनदेवजी महाराजांची वाणी, अहमदाबाद – १० सप्टेंबर १९९५

परमपिता सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी आपणांस त्यांचे गुणगान करण्याची, तसेच त्यांची भक्ती करण्याची संधी दिलेली आहे. एकदा नदीच्या पाण्यात एक लाकडाचा ओंडका वाहत चालला होता. त्याच्या जवळूनच एक नौकादेखील चालली होती. तो ओंडका पाण्यात वाहताना कधी पाण्याखाली बुडत होता तर कधी पाण्यावर येत होता. त्या नौकेकडे पाहून त्या ओंडक्याच्या मनात विचार आला की जवळून जाणारी नौका लाकडांचीच बनलेली आहे व मी देखील लाकूडच आहे. असे असूनही आम्हां दोघांमध्ये असा फरक का बरे असावा? जो माझी सोबत करतो (माझ्या आधारे पाण्यात प्रवास करतो) त्यास मी कधी पाण्यात बुडवतो तर कधी पाण्याबाहेर आणतो. मी स्वतः कधी किनारा गाठू शकत नाही व माझ्या आधाराने तरंगणाऱ्यास मी किनाऱ्याला नेऊ शकत नाही. परंतु या नौकेमध्ये बसणारा मनुष्य मात्र त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहचतो.

त्या ओंडक्याने त्या नौकेस प्रश्न विचारला की, ''तुझ्या व माझ्यात हा फरक का आहे? आपण तर दोघेही लाकडेच आहोत.'' त्या ओंडक्यास नौकेने अतिशय प्रेमाने उत्तर दिले की,''हे बघ! हे सर्व मला बनविणाऱ्या कारागिरांचे कौशल्य आहे. मला अत्यंत कुशल कारागिरांनी बनविले आहे. अगोदर त्यांनी माझे शरीर कापले, मग त्यावर रंध्याचा वापर केला. नंतर त्यांनी अणुकुचीदार खिळे ठोकले. या सर्व प्रक्रियेमध्ये मला अतिशय वेदना झाल्या. परंतु मी आता पाण्यावर सहज तरंगते व मजा करते. माझ्यावर जी माणसे स्वार होतात, त्यांना मी त्यांच्या मुक्कामास पोहचवते. ही सर्व मला बनविणाऱ्या त्या कुशल कारागिरांची कृपा आहे.

सर्वप्रथम आपल्या अंतरात स्वत:चे नौकेत रुपांतर करुन घेण्याची इच्छा हवी, सोबत नौका बनविणारे कुशल कारागिर आपणांस लाभणे गरजेचे आहे. तसेच ते कारागिर आपले रूपांतर नौकेत करीत असताना होणाऱ्या वेदनांबद्दल आपण कां कूं (तक्रार) करू नये, कारण ही त्यांची मर्जी आहे की कशाप्रकारे कापावे, कसा रंधा फिरवावा व खिळ्यांनी फळ्या कशा जोडव्यात.''

पुढे ती नांव त्या ओंडक्यास म्हणाली की,''मी तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगते की आपणांस जर आपले रूपांतर नौकेत करू शकणारा कुशल करागीर मिळण्या ऐवजी एखादा अज्ञानी मनुष्य भेटला, ज्यास नौका बनविण्याचे ज्ञानच नाही, ज्यास कल्पनाच नाही की लाकूड कसे कापावे, रंधा किती मारावा व ते कसे जोडावे, तर तू अनुपयुक्त ठरशील आणि एखाद्या निरुपयोगी नौकेप्रमाणे बाजारामध्ये तुझी विक्री होईल. एखादा लोहार तुला विकत घेईल. प्रथम तुला जाळून तो तुझे रूपांतर कोळश्यामध्ये करील. त्या कोळशास इंधन म्हणून पुन्हा जाळले जाईल.''

सर्वप्रथम शिष्याच्या अंतरामध्ये परमात्म्याच्या भेटीसाठी विरह, तळमळ असणे गरजेचे आहे. मग त्यासाठी त्यास परिपूर्ण सतगुरु भेटणे देखील गरजेचे आहे. त्यानंतर त्या शिष्यास सतगुरुंच्या मर्जीनुसार पारमार्थिक मार्गावर कसलीही तक्रार न करता वाटचाल करावी लागते.

जे सतगुरुंपुढे कां कूं करतात, त्यांच्या स्थितीविषयी महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''एखाद्या व्यक्तीस आदराने नमस्कार करणे व मग त्यास दुरुत्तर देणे हे दोन्ही चुकीचे आहे. अशा व्यक्तीचा आदरास्पद नमस्कार अथवा दुरुत्तर दोन्ही स्विकारले जात नाहीत.'' स्वामीजी महाराज म्हणतातः

***गुरु मिले जन धुन का भेदी शिष्य विरह घर आई ।***

जो मनुष्य अतिशय तहानलेला असतो, त्यास पाण्याची कदर असते. परंतु ज्यास तहानच लागलेली नसते, तो पाणी पिताना अनेक नखरे करतो.

मी सैन्यामध्ये असताना आम्हांस योगाभ्यास शिकवित असत. योगाभ्यासात शरीराच्या प्रत्येक अवयवाचा व्यायाम करविला जातो, आसने करविली जातात. त्यामुळे मनुष्य इतरांना आश्चर्यचकीत करण्याजोगी कामे देखील करु शकतो. शरीराचे गाठोडे बनविणे, हवेत उडणे अशा क्रियादेखील तो करू शकतो. योगासने केल्याने शरीराचा प्रत्येक अवयव लवचिक होतो. परंतु योगासनांचे केवळ शरिरीकच फायदे असतात. त्यांचा इतर काहीही उपयोग होत नाही.

कबीर साहेबांनी त्यांच्या वाणीमध्ये धोतर आणि नेतीचा (योगाभ्यासात वापरल्या जाणाऱ्या दोरीचा) उल्लेख केलेला आहे. सैन्यामध्ये लालेखान नामक शिक्षक आम्हांस रेशमी दोरीचे एक टोक, आपल्या एका नाकपुडीमध्ये घालून त्यादोरीचे दुसरे टोक दुसऱ्या नाकपुडीमधून बाहेर काढणे शिकवित असत, ज्यामुळे मस्तकस्थानी असलेली घाण बाहेर पडत असे. साधारणपणे ही क्रिया करताना त्या दोरीस मेण चोपडलेले असते. परंतु आमचे योगाभ्यासाचे शिक्षक अतिशय कठोर होते. ते मेणाचा वापर करू देत नसत. ते म्हणत असत की, ''तुम्ही मेणाशिवाय ती क्रिया करण्याचा अभ्यास करा.''

प्रियजनहो! संतमतामध्येदेखील शरीराच्या प्रत्येक अवयवाची साधना करून घेतली जाते. नेत्र, नाक व इतर प्रत्येक अवयवाची साधना करावी लागते. आपण कोणतीही साधना न करता संसारीक गोष्टींचे विष प्राशन करीत रहातो व सोबत होणाऱ्या त्रासाने आपण हाय! हाय! देखील करीत राहतो.

तुमच्यासमोर गुरु अर्जुन देवजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे. ही वाणी अतिशय काळजीपूर्वक ऐकून, त्यामध्ये केलेल्या उपदेशांवर अंमल करण्यायोग्य आहे. संतांनी लिहिलेल्या वाणीचे मुल्य आपण कोणत्याही स्वरूपात देऊ शकत नाही. खरे तर त्या वाणीच्या प्रत्येक शब्दाचे मुल्य आपण करोडो रूपये देऊनही चुकते करू शकत नाही. महात्म्यांच्या वाणीनुसार जर आपण जीवन जगू लागलो, तर आपला जन्म सत्कारणी लागतो.

निव्वळ पारायण करायचे म्हणून भाई रात्रं-दिवस गुरु-ग्रंथ साहेब ग्रंथाचे पठन करतात. अशारितीने ग्रंथाचे पठन करणाऱ्या कमीत कमी वीस भाईंनी तरी माझ्याकडून शब्दनाम प्राप्त करून घेतले आहे. ते म्हणतात की तुम्हांस काय सांगावे? आता आम्ही वाणी वाचतो तेव्हा वाणीचे शब्द हृदयात बाणाप्रमाणे लागतात. नाम घेतल्यानंतरच कल्पना येते की गुरु नानक देवजी महाराजजींची वाणी किती अनमोल, किती अर्थपूर्ण तसेच जीवन सुधारक आहे.

आमच्या प्रांतात ६२ आर. बी. या गावी येथे राहणाऱ्या एका भक्ताने ११६० वेळा गुरु-ग्रंथ साहेब ग्रंथाची पारायणे केल्यानंतर शब्दनाम प्राप्त करून घेतले. त्यानंतर तो आपल्या लंगरमध्ये तना-मनाने खूप सेवा करीत राहिला. तसेच त्याने ग्रंथाचे पठन करणाऱ्या अनेक भाईंना शब्दनाम प्राप्त करवून दिले. मी स्वतः नंतर पाहिले की अनेक शिख त्यास अंघोळ घालून त्या भक्ताद्वारे गुरु-ग्रंथसाहेबाचे पारायण करवून घेत की, तू खरा शिख आहेस, मद्य-मांसाचे सेवन करीत नाहीस आणि अंतरातून शब्दनामाशी जोडला गेलेला आहेस. आता तुम्ही गुरु अर्जुन देवजी महाराजजींची वाणी काळजीपूर्वक ऐका.

**नैनों नींद पर दृस्ट विकार ।। स्त्रवण सोए सुण निंद विचार ।।**

गुरु अर्जुनदेवजी महाराज सर्वप्रथम नेत्र व कर्ण या अवयवांचा उल्लेख करीत आहेत. ते सांगतात, परमेश्वराने आपणांस नेत्र दिलेले आहेत. झोप केवळ शरीरास आराम मिळावा यासाठीच असते. परंतु याचा अर्थ असा नाही की आपण रात्रं-दिवस झोपूनच रहावे. प्रत्यक्षात आपण परमात्म्याच्या दिशेने झोपलेलो आहोत व या जगाच्या दिशेने जागृत अवस्थेत आहोत.

गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगत आहेत, ''आपले नेत्र सुंदर स्वरूपाकडे पहातात, सुंदर सजविलेल्या अन्न पदार्थांकडे आकर्षित होतात. आपले नेत्र इतर लोकांनी कमावलेली धनसंपत्ती पाहून आपण देखील धनसंपत्ती कमवावी, आपली देखील स्वतःची विमाने असावीत ज्यात बसून आपण आभाळात उडावे, अशा नाशिवंत संसारीक वस्तूंची इच्छा आपल्या अंतरात निर्माण

करतात.'' संतांनी त्यांच्या वाणीत आत्म्यास पत्नी तर परमात्म्यास तिचा पती असे संबोधले आहे. गुरु नानकदेवजी महाराजांनी त्यांच्या वाणीत याचा उल्लेख करण्यासाठी 'धन-पीर' या शब्दाचा वापर केलेला आहे.

मी सत्संगाच्या कार्यक्रमासाठी पहिल्या विश्व दौऱ्यावर गेलो असता तेथील अनेक विदेशी मुलींनी मला प्रश्न विचारला होता की महाराज कृपालजींनी जो काही उपदेश दिलेला आहे, तो केवळ स्त्रियांसाठीच आहे, म्हणून मी ही शंका दूर करण्यासाठी अनेकदा हेच सांगतो की संतांचा उपदेश स्त्री-पुरुषांसाठी एकसमान असतो. तो जितका स्त्रियांसाठी लागू होतो तितकाच पुरुषांसाठी सुद्धा लागू होतो. गुरु साहेब सांगतातः

***प्रथाए साखी महा पुरख बोलदे सांझी सगल जहाने ।***

संतांचा उपदेश स्त्री-पुरुष, प्रत्येक देशातील तसेच सर्व जातींमधील लोकांसाठी एकसमानच असतो. खरेतर लिंग-भेद, जाती-वर्ण भेद, अमेरिकन-हिंदुस्थानी हे सर्व भेद बाह्यजगापुरतेच मर्यादित आहेत. तुम्ही बायबल वाचून पहा! त्यामध्ये असे कोठेही म्हटलेले नाही की त्यात केलेले मार्गदर्शन केवळ अमेरिकन जनतेसाठी आहे, ते इस्त्रायलच्या जनतेसाठी नाही किंवा रशियातील जनतेसाठी आहे आणि रोम वा हिंदुस्थानातील जनतेकरीता नाही. त्यामध्ये केलेला उपदेश सर्वांसाठी आहे. जो कोणी त्यातील उपदेशानुसार आयुष्याची वाटचाल करेल, त्याचे आयुष्य सत्कारणी लागेल.

महाराज सावन सिंहजी तसेच महाराज कृपाल सिंहजी संगतला गुरुग्रंथ साहेबमधील वाणीवर सत्संग ऐकवीत असत. मी देखील त्यामधील वाणीवरच तुम्हांस सांगत आहे. या ग्रंथामध्ये एकाही शब्दाने असे लिहिलेले नाही की हा ग्रंथ केवळ पंजाबी वा हिंदुस्थानी वा अमेरिकन लोकांसाठीच आहे. सर्व महात्मा एकसमानच वचन बोलतात. परंतु खऱ्या अर्थाने संत-वचनाचा फायदा तेच लोक करून घेतात, जे लोक त्या वचानांवर अंमल करतात, त्या वचनांनुसार जीवनाची वाटचाल करतात. तुम्ही जपजी साहेब ग्रंथामध्ये वाचताः

***सबना जीआ का ऐको दाता सो मैं विसर न जाईं।***

मुसलमानांच्या पवित्र कुराणामध्ये लिहिले आहेः

***रबूल आलमीन ।***

त्यामध्ये रबूल मुसलमीन असे लिहिलेले नाही. परमात्मा केवळ मुस्लीमांचा नसून तो सर्व विश्वाचा आहे. आपण जेव्हा महापुरुषांची वाणी वाचतो, तेव्हा आपल्या मनातील धार्मिक भेदभाव नष्ट होतो, वाणीचा खरा अर्थ आपल्या लक्षात येतो. ज्या जीवीत महापुरुषाने त्याच्या जीवनात ध्यान-अभ्यास करून अशा शंकांचे निरसन करून घेतलेले असते, त्या महापुरुषाच्या चरणाशी आपण जेव्हा बसतो व त्यांच्या उपदेशांनुसार आपल्या आयुष्याची वाटचाल आपण करू लागतो, तेव्हा आपल्यादेखील शंकांचे निरसन आपोआपच होते.

आपण जेव्हा संत-महात्म्यांकडे जातो, तेव्हा सर्वप्रथम ते सत्संगाद्वारे आपल्या अंतरात 'नाम' जपण्याची आवड निर्माण करतात. आपण बाह्य जगात जीवन जगताना एखाद्या कोळी किड्याप्रमाणे आपल्या सभोवती विषय-विकारांचे जाळे तयार केलेले असते, ज्यामधून स्वत:ची सुटका करवून घेणे आपण अवघड करून ठेवलेले असते. त्याचा उल्लेख करीत संत-महात्मा सांगतात, ''मुला! विषय-विकारांमुळे तुझे जीवन शुष्क होईल. या विषय-विकारांचा फास जो तू गळ्यात घातलेला आहेस, तो फास विषय-विकार भोगून तू जेवढा आवळशील, तितकाच अधिक त्रास तुला होईल.''

जेव्हा आपण महात्म्यांचा सत्संग ऐकून सर्व प्रकारच्या नशांचा त्याग करतो, एखाद्या प्राण्याचा जीव घेऊन त्याचे मांस खाऊन आपले पोट भरणे आपण सोडून देतो (मांसाहार त्यागतो), सर्व जीवांमध्ये आपणांस परमात्मा दिसू लागतो. अशावेळी महात्मा आपणांस ध्वनी व नामाचे ज्ञान देतात. ते त्यांनी स्वतः कमावलेले नाम आपणांस देतात. या जगाचे स्मरणच आपणांस या जगामध्ये वारंवार खेचून आणते. नामस्मरणाचे एवढे महात्म्य आहे की त्याद्वारे जगात पसरलेले आपले लक्ष आपण आपल्या दोन्ही नेत्रांच्या दरम्यान, पाठच्या बाजूला, तिसऱ्या तिळावर एकाग्र करू शकतो.



असा एकही माणूस या जगात नाही, ज्याची त्याने इच्छीलेली सर्व कार्य पूर्ण झालेली आहेत. कोणाची दोन कार्य पूर्ण होऊन दोन बाकी आहेत तर कोणाची दहा कार्य पूर्ण होऊन पाच कार्य बाकी आहेत. आपल्या मृत्युसमयी अपूर्ण राहिलेल्या कार्याबद्दलचे संकल्प-विकल्प अंतरामध्ये येऊ लागतात की अमुक-अमुक कार्य बाकी राहिले. मृत्यूसमयी अंतरात येणाऱ्या संकल्प-विकल्पांनुसारच आपणांस पुढचा जन्म मिळतो.

संतांना आम्हां लोकांमधील असलेल्या कमतरतांचे आणि दोषांचे ज्ञान असते. कोणत्याही गोष्टींचे स्मरण करण्याची आपणांस पहिल्यापासूनच सवय असते. तुम्हीच पहा! तुम्ही आता सत्संगात बसलेले असूनही तुमचे मन **संसारिक कल्पनांमध्ये** गुंतलेले आहे. संतांनी दिलेल्या शब्दनामाचे स्मरण सुरुवातीला आपण जिव्हेच्या मदतीने करतो. जेव्हा जिव्हेच्या मदतीने केलेले नामस्मरण परिपक्व होते, तेव्हा आपण मनाद्वारे नामस्मरण करू लागतो. जेव्हा मनासही नामस्मरण करण्याची सवय होते तेव्हा आपला आत्मा आपोआपच त्या नामाचे स्मरण करू लागतो.

आता ज्या **संसारिक कल्पना** आपल्या अंतरात येत असतात त्याऐवजी शब्दनामाचे तरंग आपल्या अंतरात उमटू लागतात. ज्या अंतरात अशारितीने नामाचे तरंग उमटत असतात, ती व्यक्ती झोपेत असताना काही बरळली तरीही त्या व्यक्तीच्या अंतरात नामस्मरणाचे तरंग उमटत असतात. तीव्यक्ती जिभेद्वारे काहीही बोलत असेल, तरीही त्या व्यक्तीचे हृदय नामस्मरणाच्या तरंगांशी एकरूप झालेले असते. ज्यांचे हृदय नामस्मरणाशी एकरूप झालेले नसते, ते संसारिक गोष्टींच्या स्मरणामध्ये गुंतलेले असल्यास, त्या व्यक्तीस झोपेत असताना कसलाही हलकासा धक्का जरी लागला, तरी ती व्यक्ती मारा! पकडा! तो पळत आहे! असे बडबडू लागते.

एका वाण्याचे मिठाईचे दुकान होते. त्या दुकानामध्ये एक शेतकरी मिठाई विकत घेण्यासाठी गेला असता, शेतकऱ्याने वाण्यास मिठाईचा भाव विचारला.

वाणी म्हणाला एका रूपयास चार शेर मिठाई मिळेल. परंतु शेतकऱ्याने एका रूपयास पाच शेर मिठाईची मागणी केली, त्यामुळे वाण्याने त्यास नकार दिला. नकार ऐकून शेतकरी तेथून निघून गेला. त्यानंतर वाण्यास थोडीशी डुलकी आली असता तो झोपेतही म्हणू लागला,''एका रूपयास चार शेरच मिठाई मिळेल.'' त्या वाण्याच्या शेजारच्या दुकानातील दुकानदाराने पाहिले की वाण्याकडे गिऱ्हाईक तर नाही, तरीही तो बडबडत आहे. त्याने वाण्यास हलवून जागे केले. आपल्या जिव्हेस नामस्मरणाची सवय जर जडली नाही तर आपणही त्या वाण्याप्रमाणे स्वप्नातसुद्धा भांडू लागतो.

बाबा बिशनदासजी सांगत असत की एक शेतकरी मलमली वस्त्र खरेदी करण्यासाठी वाण्याच्या दुकानामध्ये गेला असता, सौदा काही जमला नाही. तो शेतकरी गेल्यानंतर वाण्यास डुलकी आली. त्या वाण्याने झोपेतच भावाची तडजोड केली व आता तरी ताग्यातून कापड फाडू का? असे म्हणत त्याने स्वतःच्या अंगावर घेतलेला शेला कापला. झोपेतून जागा झाल्यावर त्याने पाहिले की तेथे ना शेतकरी आहे ना मलमलचा तागा. त्याचा शेला मात्र फाटलेला होता. कबीर साहेब म्हणतातः

***सुपने हूं बरड़ायके जे मुख निकसे राम ।***
***तांके पग की पनही मेरे तन को चाम ।।***

संतांचे हे सर्व सांगण्यामागे आपणांस हेच समजावण्याचा हेतू आहे की, नामस्मरण करणे अवघड नाही, तुम्ही आतादेखील संसारिक बाबींचे स्मरण करत आहात ना? नामस्मरण अशारितीने करू नये की तासभर जिव्हेद्वारे नामस्मरण केल्यानंतर पाच-सात तास सोडून दिले व मग पाच सात दिवस पुन्हा बिलकुल नामस्मरण केले नाही. आठवड्यानंतर सत्संगामध्ये गेल्यावर पुन्हा नामस्मरणाची आठवण आली तेव्हा केले.

ध्यान-अभ्यास करीत करीत जेव्हा आपल्या अंतरातून संसाराचा रंग उतरतो, तेव्हा नामस्मरणाचा रंग चढू लागतो. तुम्ही पहा! आपल्या तिसऱ्या

तिळाशी आपले गहिरे नाते आहे. आपण जो काही विचार करतो, आपल्या अंतरात ज्या काही कल्पना येतात या सर्वांची सुरुवात तिसऱ्या तिळापासूनच होते. तुलसी साहेब म्हणूनच सांगतातः

***दिल का हुजरा साफ कर जाना के आने के लिए ।***
***ध्यान गैरों का उठा उसके बिठाने के लिए ।।***

आपण आपल्या अंतरामध्ये जी दुनियादारी, मी–माझे हे जे सर्वकाही भरून ठेवलेले आहे, ते सर्व नामस्मरणाच्या मदतीने बाहेर काढून टाकावे व तेथे परमात्म्याच्या वास्तव्यासाठी जागा करावी. ध्यान–अभ्यास व नामस्मरण करीत आपण जेव्हा आपल्या तिसऱ्या तिळावर आपले लक्ष एकाग्र करतो, सतगुरुंना आपल्या अंतरात प्रगट करवून घेतो तेव्हा आपली नामस्मरणाची जबाबदारी पूर्ण होते. एखाद्या गोष्टीचे वारंवार उच्चार करण्यास महात्मा जप करणे असे म्हणतात. कबीर साहेब सांगतातः

***जाप मरे अजपा मरे अनहद भी मर जाए ।***
***सुरत समानी शब्द को तां को काल न खाए ।***

आपण जेव्हा संतांनी केलेल्या उपदेशानुसार आपले जीवन जगतो, सतगुरुंच्या चरणी पोहचतो, तेव्हा आपला जप पूर्ण होतो. त्यानंतर आपल्या अंतरामध्ये आपोआप होत असलेल्या जपाच्या मदतीने आत्म्यावर स्थूल, सुक्ष्म व कारण ही आवरणे दूर करून ब्रम्हाची हद्द पार करीत आपण पारब्रम्हामध्ये पोहचतो तेव्हा स्त्री–पुरुष असा लिंगभेद नाहीसा होतो. अमेरिकन वा हिंदुस्थानी तसेच श्वेतवर्णीय–कृष्णवर्णीय असे सर्व भेद नष्ट होतात. तरीही सचखंड या पातळीवरून दोन पातळ्या वर असतो.

पारब्रम्हामध्ये पोहचलेले महात्मा सर्व विश्वाला आपले घर समजतात, कारण त्यांची नजर आत्म्यावर असते व नीचता आपल्या मनात असते. आपण पूर्ण संतांची वाणी वाचून पाहिली तर त्यात तुम्हास व्दैत–भाव आढळणार नाही, ते सर्वांचे भलेच चिंतीतात. गुरु नानक देवजी महाराज सांगतातः

*नानक नाम चढ़दी कला, तरे भांणे सरबत दा भला ।*

पंजाबमध्ये मुस्लिम लोकांची एक मजारी (थडगे) आहे. पाऊस पडला नाही तर लोक तेथे जाऊन नवस बोलतात, कोंबड्यांचा बळी देतात तसेच तेथे मद्य वाहिले जाते. यावर्षी सर्वत्र भरपूर पाऊस पडला. तेव्हा पावसामुळे ज्या लोकांची घरे वाहून गेली, त्या लोकांनी त्या मजारीवर नवस केला की पाऊस थांबावा. ज्या ठिकाणी पुरेसा पाऊस पडला नाही, तेथील लोकांनी त्याच मजारीवर पाऊस पडावा म्हणून नवस केला. आता तुम्हीच पहा! त्या दोन्ही समुहाच्या लोकांनी परमेश्वरास देखील द्विधा अवस्थेत पाडले. संत या जगात येतात, तेव्हा आपणांस अशा तऱ्हेची शिकवण देत नाहीत. ते सर्वांचेच हित चिंतण्यास सांगतात.

आपण सांगत आहात की आपले नेत्र परमात्म्याच्या दिशेने झोपलेले आहेत व संसाराच्या दिशेने जागृत आहेत. आपले कान दुसऱ्यांची निंदा ऐकून बंद पडण्याची वेळ आली आहे. त्या कानांमध्ये परमात्म्याची शब्द–धुन ऐकूच येत नाही. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''एखाद्या पापीची निंदा करणे देखील वाईट आहे. आपण नामधारीची निंदा केल्यास, आपणांस कोणत्या नरकात स्थान मिळेल? खरेतर निंदा आपल्या अंतरामधील परमार्थाची मुळेच कापून टाकते.'' संत अतिशय प्रेमाने सांगत आहेतः

*निंन्दा भली काहू की नाहीं मनमुख मुग्ध करन ।*
*मुँह काले तिन निन्दका नर्के घोर पवन ।।*

**रसना सोई लोभ मीठै साद ।। मनु सोया माया बिसमाद ।।**

आपली जिव्हा स्वादिष्ट अन्न खाण्यात दंग असते. आपला भरपूर होत असलेला व्यापार, आपले इतरांपेक्षा अधिक अलिशान असलेले घर तसेच घरासमोर उभ्या असलेल्या गाड्या, ही सर्व मायेची स्वरूपे पाहण्यात आपले मन दंग असते. परंतु ते मन परमात्म्याच्या दिशेने मात्र झोपलेले असते.

**इस गृह मह कोई जागत रहै ।। साबत वस्त ओह अपनी लहै ।।**

आपण प्रेमाने सांगत आहात की, नेत्र, कर्ण, जिव्हा वगैरे ही सर्व इंद्रिये आपणांस सद्‌उपयोगासाठी दिलेली आहेत. आपण मात्र या इंद्रियांचा दुरुपयोग करीत स्वतःही अस्वस्थ रहातो, तसेच त्या इंद्रियांनादेखील अस्वस्थ करतो. जिव्हेंद्रियेच्या आहारी गेलेल्या माणसांची अवस्था मी स्वतः पाहिलेली आहे. अन्न कसेही बनविले असले तरी जेवणापूर्वी ती माणसे भांड्यावर राग काढतात व नंतर म्हणतात,''हे अन्न खाण्यालायक तरी आहे काय?'' ते भरलेले ताट तसेच सोडून जातात, परंतु काही वेळाने परत ताटाजवळ येतात. ते जेवताना खूप नखरे करतात, कारण ते जिव्हेचे गुलाम बनलेले आहेत.

सर्वप्रथम मी माझ्याच घरातील गोष्ट सांगतो. माझ्या वडिलांना जेवणामध्ये दोष काढण्याची अतिशय सवय होती. माझी आई जेवण तर तयार करीत असे, परंतु वडिलांना ते जेवण देण्याची ना माझ्या आईमध्ये हिम्मत असे ना बहिणींमध्ये. त्यामुळे वडिलांसमोर जेवणाचे ताट ठेवण्याची जबाबदारी माझी असे. एके दिवशी मी जेवणाचे ताट खाली वाकून वडिलांसमोर ठेवून मी सरळ उभे राहण्यापूर्वीच ते ताट माझ्या डोक्यावरून वडिलांनी रागाने भिरकावून दिले. खरेतर वडिलांनी त्या ताटातील अन्नाचा एखादा घासदेखील चाखला नव्हता, की ते अन्न आंबट आहे की गोड आहे? ते म्हणाले,''माझ्या डोक्यावर टाकायला हे काय आणले आहेस?'' त्यावर मी म्हणालो, ''तुमच्या अशा वागण्याने अन्न स्वादिष्ट झाले का?''

गुरु अर्जुनदेवजी महाराज म्हणतात,''या ग्रहावर असा विरळा एखादाच जागृत आत्मा असेल जो या इंद्रियांच्या रसास्वादापासून बचावलेला असेल.'' महाराज कृपाल सांगत असत की,''सत्याचे बीज नाश होत नाही. मी सकाळीच सांगितले होते की आत्म्यावर एकदा का नामाचा रंग चढला, तर तो रंग पुन्हा उतरत नाही. परिस-स्पर्श होऊन सोने झालेल्या लोखंडाचे रूपांतर पुन्हा लोखंडात होत नाही. त्याचप्रमाणे एकदा का आपण इंद्रियांच्या गुलामीचा त्याग करून, शब्दनामाशी एकरूप झालो की पुन्हा आपल्यावर या संसारिक गोष्टींचा

रंग चढत नाही. याचप्रमाणे एकदा का आपल्या अंतरात शब्दध्वनी प्रगट झाला, सतगुरु प्रगट झाले, तर आपला आत्मा कधीही मनुष्यजन्माच्या कमतरतांचा, इंद्रियांचा शिकार पुन्हा होत नाही.''

## सगल सहेली अपनै रस माती ।। गृह अपने की खबर ना जाती ।।

पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये आहेत. या सर्व मैत्रिणी असून त्या त्यांच्या रसास्वादाकडे आत्म्यास खेचत असतात. कर्णेंद्रिये सुगम रागांकडे तर स्वादेंद्रिये (जिव्हा) आत्म्यास स्वादिष्ट पदार्थांकडे आकर्षित करतात. याचप्रमाणे उर्वरित इंद्रिये ज्या ठिकाणी त्यांच्या स्वादाची पूर्ती होते, त्या ठिकाणी आपणांस आकर्षित करतात. परंतु गुरु नानक देवजी म्हणतात की मृत्युपश्चात परमेश्वर दरबारी मात्र ही सर्व इंद्रिये आत्म्याच्या विरोधामध्ये साक्ष देतात. नाक म्हणते की याने माझ्याद्वारे सुगंधाचा आस्वाद घेतला, तर कर्णेंद्रिये म्हणते की याने माझ्याद्वारे निंदा ऐकली. शरीराच्या निम्न भागातील दोन्ही इंद्रिये याचप्रमाणे उत्तरे देतात. गुरु नानक देवजी महाराज म्हणतातः

***अवगुण फिर लागू हुए कूड़ बजाए तूर ।***

हे सर्व दोष आपल्यांवर लागू होतात. मग काळाचे दूत आत्म्यास पकडून नेतात, तेथे जाऊन डमरू वाजवून म्हणतात की आम्ही यास पकडून आणले आहे. बाह्य जगात पहा, कशारितीने संगणक (कंप्युटर) व्यावहारिक हिशोबाची नोंद ठेवतात. त्याचप्रमाणे आपल्या कर्मांच्या हिशोबाची नोंदणी करण्यासाठी परमात्म्याने ठेवलेला संगणक या संगणकापेक्षा कितीतरी पटीने अधिक वेगवान आहे. तुम्ही कोठे चुकूनही गैरसमज करून घेऊ नका की आपण करीत असलेली कर्मं कोणी पहात नाही वा त्याची कोठे नोंद होत नाही.

## मुसनहार पंच बटवारे ।। सूने नगर परे ठगहारे ।।

गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगत आहेत,''आत्म्याची पुंजी लुटणारे पाच डाकू आहेत. या शरीररूपी नगराचा मालक झोपलेला आहे. अशावेळी त्या डाकूंच्या मर्जीवर अवलंबून असते की मागे काही माल बाकी सोडावा वा सोडू

नये. परंतु जेव्हा घराचा मालक जागृत होतो, त्यास परिस्थीतीची जाणीव होते, तेव्हा तो आवेशात येऊन त्या डाकूंचा विरोध करतो. मग मात्र ते डाकू तेथून पळ काढतात.''

**उन ते राखै बाप न माई ।। उन ते राखै मीत न भाई ।।**

गुरु अर्जुनदेवजी महाराज स्वतःचा अनुभव वर्णन करून सांगतात की काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच डाकूंपासून आपले आई–वडील, भाऊ–बहीण किंवा कोणीही मित्र–मंडळी आपणांस वाचवू शकत नाही, कारण या रोगांनी ते स्वतःच ग्रस्त असतात.

**दरब सिआणप ना ओय रहते ।। साध संग ओय दुस्ट वस होते ।।**

आपल्या अवाक्यात हे पाच डाकू ना शिक्षण घेतल्याने, ना पैशांच्या मदतीने येतात. गुरु अर्जुन देवजी महाराज या डाकूंना कोठे पाकिटमार तर कोठे दरोडेखोर तर येथे त्यांना दुष्ट असे संबोधतात.

आपल्या आयुष्यामध्ये जर आपणांस एखादे परिपूर्ण महात्मा लाभले तर आपण त्यांच्या शिकवणुकीनुसार 'शब्द–नामाची' कमाई करावी. अशी कमाई करताना सुरुवाती–सुरुवातीला आपणांस संघर्ष करावा लागतो. परंतु संघर्षास सुरुवात झाली की आपला जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.

**कर किरपा मोहे सारिंगपाण ।। संतन धूर सरब निधान ।।**

आपण आता सांगत आहात, ''ज्याप्रमाणे चातक पक्षी पाण्यासाठी पिरो–पिरो, पाणी–पाणी असा आक्रोश करीत असतो, त्याप्रमाणे मी तुझ्यासमोर प्रार्थना करीत आहे की तू मला माफ कर, तुझा प्रिय संतांच्या चरणांची धूळ मला दे, ज्यायोगे माझ्या आत्म्याची नौका या भवसागरा पार जाईल.''

**साबत पूंजी सतगुर संग ।। नानक जागै पारब्रम्ह कै रंग ।।**

गुरु नानक देवजी महाराज सांगतात, ''सत्य हे आहे की परमात्म्याने आपणांस खरी पुंजी जी दिलेली आहे, ती सांभाळून आपण तेव्हाच घेऊन




जाऊ शकतो, जेव्हा आपण परिपूर्ण गुरुंच्या शिकवणीनुसार पारमार्थीक मार्गावर वाटचाल करतो व त्यांची दया प्राप्त करुन पारब्रम्हात पोहचतो, नामाच्या रंगात रंगतो व **संसारिक कल्पना** त्यागतो.''

**सो जागै जिस प्रभ किरपाल ।। एह पूंजी साबत धन माल ।।**

परमात्म्याप्रती तोच आत्मा जागृत होतो, ज्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो व तोच परमात्म्याने दिलेली पवित्र पुंजी सांभाळून सोबत नेऊ शकतो.

प्रियजनहो! गुरु अर्जुनदेवजी महाराज कोठेतरी ऐकल्या-सांगितल्या जाणाऱ्या गोष्टी सांगत नाहीत. त्यांनी स्वतःचे आयुष्य याप्रमाणे घडविले, तसेच आपणांसदेखील त्याप्रमाणे वागण्याचा उपदेश देत आहेत. आता आपलेही कर्तव्य आहे की त्यांच्या उपदेशानुसार आपण आपले आयुष्य घडवावे. आपल्या सतगुरुंच्या सांगण्यानुसार शब्द-नामाची कमाई करून आपण पारब्रम्हामध्ये पोहचावे. कारण जन्माजन्मांतरापासून निद्रावस्थेत असलेलो आपण पारब्रम्हामध्ये पोहचल्यावरच जागृत होतो.

***

# धन्य अजायब



गुरु प्रिय सत्संगी बंधू-भगिनींनो,

परमसंत अजायब सिंह महाराजजींच्या अपार दयेने **अहमदाबाद** येथे **४, ५ व ६ जुलै २०१४** रोजी खालील दिलेल्या पत्त्यावर सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. तेव्हा सर्व बंधू-भगिनींना नम्र विनंती आहे की त्यांनी सत्संगाच्या कार्यक्रमात सहभागी होऊन संतवचनांचा तसेच ध्यान-अभ्यासाच्या सुसंधीचा लाभ घ्यावा.

**ईश्वर भवन**

**(कॉमर्स कॉलेज क्रॉस रोड जवळ), नवरंगपुरा,**

**अहमदाबाद (गुजरात)**

**☎ ९९९८९४६२३१ व ९७२५००५७९४**